स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 10 एप्रिल 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## भाजपा नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांचा यशस्वी पाठपुरावा

# त्यागमूर्ती रमाई आंबेडकर स्मारकाचे भूमिपूजन जयंती महोत्सवातच होणार..!





**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या संथगतीमुळे त्यागमूर्ती रमाई आंबेडकर स्मारकाच्या उभारणीला दिरंगाई होत असल्याची गंभीर बाब समोर येत असल्याने समाजबांधवांमध्ये नाराजीचा सूर होता. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेत तीव्र आक्षेप नोंदवला. स्मारकाचे काम सुरू करण्याबाबत तात्काळ कार्यवाही सुरू करण्याची मागणी केली, यावेळी माता रमाई स्मारक समितीचे पदाधिकारी, महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आणि संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आज महापालिकेत संपन्न झाली यामध्ये त्यागमूर्ती माता रमाई स्मारकाचे भूमिपूजन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सव काळातच म्हणजे 14 एप्रिल किंवा 15 एप्रिल दरम्यानच करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती भाजपाचे नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी दिली.**



> माता रमाई आंबेडकर स्मारक हे केवळ एक वास्तू नसून समाजासाठी प्रेरणास्थान आहे. या स्मारकाच्या उभारणीसाठी येणाऱ्या सर्व अडचणी दूर करून काम तातडीने सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. शहराचे महापौर रवी लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतलेल्या निर्णयाचे सर्व समाजबांधवांच्या वतीने अभिनंदन. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे स्मारक नियोजित वेळेत पूर्ण करून नागरिकांना समर्पित करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> – **डॉ. सुहास कांबळे,** भाजपा, नगरसेवक, पिं.चिं महानगरपालिका.

पिंपरी-चिंचवडमध्ये माता रमाई आंबेडकर स्मारकाच्या उभारणीसाठी एप्रिल-२०२६ मध्ये भूमिपूजन होईल, अशी घोषणा प्रशासनाने केली होती. त्यावर काय तयारी झाली आहे? याबाबत डॉ. सुहास कांबळे यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेतली. पण स्मारकाच्या भूमिपूजनाला प्रशासनाच्या दिरंगाईमुळे उशीर होत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी महापौर व आयुक्त यांच्यासमक्ष नाराजी व्यक्त केली यावेळी नगरसेवक राहुल कलाटे तसेच रमाई स्मारक समितीचे सदस्य संतोष जोगदंड, बाळासाहेब रोकडे, बापूसाहेब गायकवाड, दशरथ ठाणांबीर, प्रमोद शेरे, नारायण म्हस्के आदी पदाधिकारी उपस्थित होते.

त्यानंतर लगेचच आयुक्त सूर्यवंशी व महापौर लांडगे यांनी संयुक्त बैठक घेत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पुढाकाराने उभारण्यात येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर स्मारकाच्या भूमिपूजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत आयुक्तांनी संबंधित विभागाला तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असून स्मारकाचे भूमिपूजन हे 14 एप्रिल किंवा 15 एप्रिल रोजी म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवादरम्यानच करण्यात येईल असे सकारात्मक आश्वासन दिले आहे.

महापालिका प्रशासनाने एप्रिल २०२६ मध्ये स्मारकाच्या कामाला सुरुवात होईल, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार महापौरांनी शहरातील नागरिकांना दिलेले आश्वासन पूर्ण होत असल्याने समाजबांधवांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# शहरात जिम्नॅस्टिक खेळाडूंसाठी स्वतंत्र हॉल उभारण्याची गरज

## नगरसेवक उदय गायकवाड यांची आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे थेट मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराने विविध क्रीडा प्रकारांमध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. कबड्डी, क्रिकेट, फुटबॉल, स्केटिंग, बॅडमिंटन आणि लॉन टेनिससाठी महापालिकेने स्वतंत्र आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून दिल्या असतानाही, जिम्नॅस्टिकसारख्या महत्त्वाच्या आणि कौशल्यपूर्ण खेळासाठी आजतागायत एकही अधिकृत हॉल उपलब्ध नसल्याची बाब समोर आली आहे.**



> “ पिंपरी-चिंचवड शहराने अनेक खेळांमध्ये राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. मात्र जिम्नॅस्टिकसारख्या महत्त्वाच्या आणि कौशल्यपूर्ण खेळासाठी आजही एकही अधिकृत हॉल उपलब्ध नसणे ही दुर्दैवी बाब आहे. खेळाडूंना योग्य सराव सुविधा मिळाल्यास अनेक खेळाडू देशासाठी पदके मिळवू शकतात. त्यामुळे जिम्नॅस्टिक खेळाडूंकरिता तातडीने स्वतंत्र व सुसज्ज हॉल उभारण्याचा निर्णय महापालिकेने घ्यावा, अशी आम्ही आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाम मागणी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.
>
> — उदय गायकवाड, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

या पार्श्वभूमीवर, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे क्रीडा व सांस्कृतिक समिती सदस्य व नगरसेवक उदय गायकवाड यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र लिहून जिम्नॅस्टिक खेळाडूंसाठी स्वतंत्र हॉल उभारण्याची ठोस मागणी केली आहे.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून जिम्नॅस्टिक खेळाडू, प्रशिक्षक आणि पालकांकडून सातत्याने हॉलची मागणी केली जात आहे. मात्र, केवळ जागेची पाहणी, प्रस्ताव आणि आश्वासनांपुरताच हा विषय मर्यादित राहिला असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

जिम्नॅस्टिक हा खर्चिक खेळ असून त्यासाठी लागणारी उपकरणे व व्यवस्था महागडी असतात. परिणामी, अनेक सर्वसामान्य कुटुंबांतील खेळाडूंना खासगी अकॅडमींचा आधार घ्यावा लागत आहे. आर्थिक अडचणींमुळे अनेक गुणी खेळाडूंची प्रगती खुंटत असून काही खेळाडू खेळापासून दूर जात असल्याचीही शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, पिंपरी-चिंचवड शहरातून दरवर्षी सुमारे १०० हून अधिक खेळाडू विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत असून, त्यापैकी २५ ते ३० खेळाडू राष्ट्रीय स्तरावर शहराचे प्रतिनिधित्व करतात. मर्यादित आणि अपुऱ्या सुविधांमध्येही त्यांनी शहराचा नावलौकिक वाढवला असताना, जिम्नॅस्टिकला महापालिकेच्या क्रीडा धोरणात अपेक्षित प्राधान्य मिळत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

येत्या काळात शहरात एरोबिक एशियन चॅम्पियनशिपसारखी आंतरराष्ट्रीय दर्जाची स्पर्धा होणार असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. अशा वेळी स्थानिक खेळाडूंना दर्जेदार सराव सुविधा उपलब्ध नसणे ही अत्यंत गंभीर बाब असून, बाहेरील खेळाडूंशी स्पर्धा करताना स्थानिक खेळाडूंना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक उदय गायकवाड यांनी महापालिकेकडे तीन ठोस मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये जिम्नॅस्टिक हॉलसाठी तातडीने योग्य जागा निश्चित करणे, आवश्यक निधी मंजूर करून बांधकामास लवकरात लवकर सुरुवात करणे, तसेच प्रशिक्षक, खेळाडू आणि संबंधित संघटनांशी समन्वय साधून जिम्नॅस्टिकला महापालिकेच्या क्रीडा धोरणात प्राधान्य देणे, यांचा समावेश आहे.

# गाड्यांऐवजी भत्ता देण्याचा प्रस्ताव; महापालिकेच्या खर्चात मोठी बचत शक्य

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**



**महापालिकेच्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांना शासकीय गाड्या देण्याऐवजी निश्चित भत्ता देण्याचा प्रस्ताव सध्या चर्चेत असून, यामुळे पालिकेच्या खर्चात मोठी बचत होऊ शकते, असा दावा स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केला आहे. नुकत्याच झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा मुद्दा चर्चेला आला.**

सध्या एका पदाधिकारी किंवा अधिकाऱ्यासाठी महापालिकेची गाडी चालवताना मोठा आर्थिक बोजा पडत असल्याचे समोर आले आहे. चालकाचे वेतन साधारण २५ ते ६० हजार रुपये असून काही ठिकाणी ते ७० हजारांपर्यंत जाते. याशिवाय गाडीचे मेंटेनन्स २० ते २५ हजार रुपये आणि इंधन खर्च २५ ते ३० हजार रुपये असा एकूण मासिक खर्च सव्वा लाख ते दीड लाख रुपयांपर्यंत पोहोचतो.

या पार्श्वभूमीवर, अधिकाऱ्यांनी स्वतःची गाडी वापरल्यास त्यांना दरमहा सुमारे ५० हजार रुपयांचा निश्चित भत्ता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला असून, तो मान्य करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे महापालिकेचा मोठा खर्च वाचणार असून अधिकाऱ्यांना स्वयंपूर्णतेने काम करण्याची मुभा मिळणार आहे. अंदाजानुसार, एका गाडीमागे जवळपास एक लाख रुपयांची बचत होऊ शकते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पदाधिकारी आणि अधिकारी हा पर्याय स्वीकारल्यास पालिकेच्या तिजोरीवरील ताण कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तथापि, हा लाभ सर्वांसाठी लागू नसून केवळ नियमानुसार पात्र वरिष्ठ अधिकारी — उपआयुक्त, क्षेत्रीय अधिकारी आणि इतर कार्यकारी अधिकारी — यांनाच ही सुविधा मिळणार आहे. इतर अधिकाऱ्यांना गाड्या किंवा भत्त्याचा लाभ दिला जाणार नाही.

दरम्यान, २०१७ नंतर अनेक अधिकाऱ्यांनी गाड्या सोडल्या होत्या. त्यामुळे पुन्हा ही योजना राबविताना प्रशासनाने स्पष्ट आणि पारदर्शक धोरण आखण्याची गरज व्यक्त होत आहे. सध्या १८ ते १९ अधिकाऱ्यांनी भत्याचा पर्याय निवडला असून काही पदाधिकारी स्वतःच्या गाड्यांचा वापर करत आहेत. “गाडी की भत्ता” या निर्णयामुळे महापालिकेच्या आर्थिक व्यवस्थापनात मोठा बदल होण्याची शक्यता असून, त्याची परिणामकारकता येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे.

# लेखाधिकाऱ्याच्या बोगसगिरीला, अभिषेक बारणेंचा चाप!

## बोगसगिरी करणारा लेखाधिकारी प्रवीण जैन यांचे कायदा विभागाने थोबाड फोडले!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**बोगस उपसूचना देऊन तब्बल 52 कोटींपेक्षा अधिक रकमेची बिले परस्पर संबंधित ठेकेदारांना 30 मार्चला दिल्याप्रकरणी महापालिका विधी व कायदा विभागाने धक्कादायक अभिप्राय नोंदवला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ९ चे कलम ८४ (२), ८६, ८७ व १०३ नुसार अर्थसंकल्पीय निधीतून खर्च करणे अथवा रक्कम कमी करणे किंवा बदली करणे इत्यादीसाठी मा. स्थायी समितीची/मा. महानगरपालिकेची मान्यता बंधनकारक आहे, असा लेखी अभिप्राय पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कायदा विभागाने स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांना पाठवला आहे.**




महापालिकेच्या सन 2026-27 चे अधिकृत अर्थसंकल्प मंजूर असताना आणि त्यामध्ये संबंधित कामांसाठी कोणतीही आर्थिक तरतूद नसतानाही सुमारे 70 हून अधिक कामांची बिले रात्रीतून काढण्यात आली. पाणीपुरवठा, स्थापत्य, बीआरटी या विभागांची तसेच, नाशिक फाटा, मोशी, तळवडे, भोसरी येथील रस्ते कामांची ही बिले आहेत. त्यासंदर्भात संबंधित विभागप्रमुखांना कल्पना देण्यात आली नाही. याबाबत स्थायी समिती सभपती अभिषेक बारणे यांनी आक्षेप नोंदवला.

तसेच, हा केवळ तांत्रिक घोळ नसून, महापालिकेच्या तिजोरीवर अधिकारी व ठेकेदारांनी संगनमताने टाकलेला दरोडा आहे. या गंभीर आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) प्रवीण जैन यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून, त्यांचे निलंबन करावे, अशी तक्रारही त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, वादग्रस्त बिलांच्या कामाबाबत संबंधित विभाग प्रमुखांनी उपसूचना दिल्या आहेत. तसेच, लोकप्रतिनिधींच्या त्यावर सूचक व अनुमोदक अशा स्वाक्षरी आहेत, असा कांगावा करीत प्रवीण जैन वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न करीत होते. त्या नुसार त्यांनी प्रसारमाध्यमांमध्ये प्रतिक्रियाही दिली होती. पण, कायदा विभागाचे त्यांच्या चुकीच्या कारभाराचा भांडाफोड केला आहे. प्रवीण जैन यांनी प्रशासकीय शिस्तीचा भंग केला असून, ते आजच्या स्थायी समितीच्या बैठकीलाही जाणूनबुजून गैरहजर राहिले. आयुक्तांनी त्यांच्या गेल्या 4 वर्षांच्या कामकाजाची झाडाझडती घ्यावी. प्रवीण जैन यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. त्यांचे तातडीने निलंबन करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### नगरसेवकांच्या सह्यांचा बनाव

प्रवीण जैन यांनी नगरसेवकांची दिशाभूल करत, दोन नगरसेवकांच्या सह्या आणल्या तरच बिल मिळेल, अशी अट घातल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विविध पक्षांच्या जवळपास 20 नगरसेवकांच्या सह्या घेऊन हा बनाव रचला गेला. ज्या सर्वसाधारण सभेच्या उपसूचनांचा आधार घेऊन ही कोट्यवधींची खैरात करण्यात आली, त्या उपसुचनांवर साधी तारीखही नाही. नगर सचिव विभागांने त्या अधिकृत उपसूचना नसल्याचे स्पष्ट केले आहे.

> “बोगस उपसूचनांच्या आधारे ५२ कोटींची बीले काढणे या घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार प्रवीण जैन हेच आहेत. हा केवळ तांत्रिक घोळ नसून, महापालिकेच्या तिजोरीवर अधिकारी व ठेकेदारांनी संगनमताने टाकलेला थेट दरोडा आहे. सन 2026-27 वर्षाचे अर्थसंकल्प मंजूर असताना, त्यात कोणतीही तरतूद नसताना 52 कोटींपेक्षा अधिकची बिले वाटलेच कसे जातात, असा प्रश्न होता. त्याला आता कायदा विभागाने “अर्थसंकल्पीय निधीतून खर्च करणे अथवा रक्कम कमी करणे किंवा बदली करणे इत्यादीसाठी मा. स्थायी ममितीची/मा. महानगरपालिकेची मान्यता बंधनकारक आहे” अशी लेखी पुष्टी दिली आहे. त्यामुळे हा घोटाळेबाज अधिकारी तात्काळ निलंबीत केला पाहिजे.
>
> **– अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# पुणे, पिंपरी चिंचवडवर पाणी कपातीची टांगती तलवार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय हवामानशास्त्र विभागाने यंदा पावसाचे प्रमाण कमी राहील असा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे खडकवासला प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेऊन हे पाणी ३१ जुलैपर्यंत कशा प्रकारे पुरविता येईल, याचे नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे महापालिकेने आतापासूनच महिन्याला उचलल्या जाणाऱ्या पाणी कोट्यात १५% पाणीकपात करावी.**




असे निर्देश जलसंपदा विभागाने महापालिकेला दिले आहेत. पाणीकपात न केल्यास भविष्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यास त्याची थेट जबाबदारी महापालिकेची असेल असेही जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे.

विभागाने पुणे महापालिकेसह, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि एमआयडीसीला अशीच सूचना केली आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने यंदाच्या मान्सूनवर ‘अल-निनो’ व ‘आयओडी’ चा प्रभाव असल्याने एकूण पाऊसमान कमी असेल असा इशारा दिला आहे. याबाबत नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यानुसार पाण्याचे नियोजन करावे, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कृष्णा व गोदावरी खोऱ्यातील उपलब्ध पाणीसाठ्याच्या काटेकोर वापरण्यासंदर्भात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाणी जपून वापरण्याबाबत विभागाला सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार खडकवासला विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी महापालिकेला याबाबत महिन्याच्या उचलण्यात येणाऱ्या पाणी कोट्यात १५ टक्के पाणीकपात करण्याचे निर्देश दिले आहेत. धरणातील उपलब्ध पाणीसाठा आणि भविष्यात अवर्षणप्रवण परिस्थिती निर्माण झाल्यास आतापासूनच पेयजलाचे नियोजन करणे गरजेचे आहे. जेणेकरून ३१ जुलैपर्यंत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे शक्य होईल आणि पाणी टंचाईचा सामना करावा लागणार नाही. त्यासाठी पिण्याच्या पाण्याचे आपल्या स्तरावर योग्य ते नियोजन करण्यात यावे, असेही देशमुख यांनी महापालिकेला पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

शहराला खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातून पाणीपुरवठा केला जातो. महापालिका दररोज १७५० दशलक्ष लिटर पाणी उचलते. त्यानुसार महिन्याला १.८३ टीएमसी पाणी दर महिन्याला उचलले जाते. जलसंपदा विभागाच्या सूचनेनुसार आता महापालिकेला ०.२७५ टीएमसीची पाणीकपात करावी लागणार आहे. या चारही धरणांत मिळून बुधवारी (दि. ८) १३.२० टक्के म्हणजे ४५.२९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच दिवशी १२.०४ टीएमसी पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीच्या तुलनेत यंदा एक टीएमसीहून अधिक जादा पाणीसाठा शिल्लक आहे. जलसंपदा विभागाच्या या निर्देशांवर आता महापालिका काय भूमिका घेते, याकडे जलसंपदा विभागाबरोबरच पुणेकरांचेही लक्ष लागून आहे.

# ‘आकृती’ वार्षिक कला प्रदर्शनाचा भव्य शुभारंभ

## विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा उत्सव डी. वाय. पाटील आकुर्डी येथे रंगणार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**कला, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्ती यांचा संगम असलेले ‘आकृती – वार्षिक शैक्षणिक कला प्रदर्शन २०२५-२०२६’ उद्या, शुक्रवार १० एप्रिल २०२६ रोजी आकुर्डी येथे भव्य स्वरूपात संपन्न होणार आहे. हे कला प्रदर्शन डी. वाय पाटील इंटरनॅशनल युनिव्हरसिटी अंतर्गत स्कूल ऑफ अप्लाईड आर्टस् अँड क्राफ्ट्स यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे.**







उद्या सकाळी १० वाजता या कला प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून, चित्रपट आणि जाहिरात क्षेत्रातील नामवंत दिग्दर्शक महेश घरत (संचालक , हंगरी फिल्म्स व ओगिल्वी साऊथचे माजी चीफ क्रिएटिव्ह ऑफिसर) यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. तर प्रख्यात कलाकार पराग बोरसे हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या प्रदर्शनाची संकल्पना “WHERE CREATIVITY MEETS EXPRESSION – A CELEBRATION OF ART & IMAGINATION” अशी असून, यात स्कूल ऑफ अप्लाईड आर्टस् अँड क्राफ्ट्स मधील विद्यार्थ्यांनी वर्षभरात साकारलेल्या कलाकृती मांडण्यात येणार आहेत. चित्रकला, शिल्पकला, कमर्शियल आर्ट, डिझाइन, क्राफ्ट आणि विविध आधुनिक कलामाध्यमांचा समावेश या प्रदर्शनात असणार आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा, सामाजिक भानाचा आणि कलात्मक दृष्टिकोनाचा आविष्कार या कलाकृतींतून पाहायला मिळणार आहे.

उद्घाटनानंतर सकाळी ११ वाजता उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ पार पडणार आहे. या समारंभास विद्यापीठाचे डॉ. संजय डी. पाटील – कुलपती, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी (DYPIU), तेजस एस. पाटील – विश्वस्त, प्रा. मनीष भल्ला – कुलगुरू, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी (DYPIU), रिअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त) – कॅम्पस संचालक, डी. वाय. पाटील एज्युकेशन कॉम्प्लेक्स (DYPEC), डॉ. (प्रा.) बीरन मोईद्दीन बी. एम. – कुलसचिव, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी (DYPIU), श्री. बिपिन शर्मा – मुख्य वित्त अधिकारी (CFO), डी. वाय. पाटील एज्युकेशन कॉम्प्लेक्स (DYPEC), डॉ. अनुपमा पाटील – अभियांत्रिकी विद्याशाखेच्या अधिष्ठाता, (DYPIU), डॉ. माधवी देशपांडे – अभियांत्रिकीतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता (DYPYU), श्री. जयप्रकाश कळवले संचालक, स्कूल ऑफ अप्लाइड आर्ट्स अँड क्राफ्ट्स (SOAAC) उपस्थित राहणार असून, गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या कलात्मक योगदानाबद्दल सन्मानित करण्यात येणार आहे. डॉ. नितीन तावरे, श्री. शरद वाडकर, श्री. राजेश पुजारी हे संपर्क प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत.

हे कला प्रदर्शन १० ते १८ एप्रिल २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत सर्व कला रसिकांसाठी खुले असणार आहे. प्रदर्शनाचे आयोजन डी. वाय पाटील इंटरनॅशनल युनिव्हरसिटी आकुर्डी येथील जे बिल्डिंग, पहिला मजला येथे करण्यात आले आहे.


विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या सर्जनशीलतेला दिशा देणे आणि कला शिक्षणाला प्रोत्साहन देणे, हा या प्रदर्शनामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. उद्याच्या या भव्य कला सोहळ्यामुळे आकुर्डी परिसरात कला आणि सर्जनशीलतेचे वातावरण निर्माण होणार असून, कला प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महापालिका ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयात कर्मचारी झोपेत; कारवाईची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाच्या निगडी येथील ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयातील विद्युत विभागात नागरिकांना सेवा मिळण्यात गंभीर अडचणी येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नागरिक विविध कामांसाठी कार्यालयात भेट देत असताना संबंधित कर्मचारीच अनुपस्थित किंवा झोपलेल्या अवस्थेत आढळून आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**





या निष्काळजीपणामुळे आवश्यक माहिती मिळत नसल्याने नागरिकांना वारंवार कार्यालयाचे फेरे मारावे लागत असून त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असल्याची तक्रार समोर आली आहे.

निगडी परिसरातील नागरिकांनी सांगितले की, वीज बिल, कनेक्शन, दुरुस्ती किंवा तक्रारी संदर्भातील कामांसाठी ते कार्यालयात जातात; मात्र तिथे उपस्थित असलेले कर्मचारी जबाबदारीने काम करत नसल्याचे दिसून येते. काही वेळा कर्मचारी आपल्या खुर्चीवरच झोपलेल्या अवस्थेत दिसतात, तर काही वेळा योग्य मार्गदर्शन न करता नागरिकांना उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. त्यामुळे नागरिकांना अपेक्षित सेवा मिळत नसून प्रशासनावरील विश्वास कमी होत असल्याचेही नागरिकांनी स्पष्ट केले.

या प्रकाराबाबत भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी तीव्र संताप व्यक्त करत महापालिका प्रशासनावर निशाणा साधला आहे. त्यांनी म्हटले की, नागरिकांच्या करातून चालणाऱ्या कार्यालयातच जर कर्मचारी निष्क्रिय राहणार असतील, तर नागरिकांनी कोणाकडे न्याय मागायचा? कार्यालयीन वेळेत झोपणे किंवा कामात टाळाटाळ करणे हा प्रकार अत्यंत गंभीर असून तो सहन केला जाणार नाही. अशा निष्काळजी कर्मचाऱ्यांमुळे संपूर्ण प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

काळभोर यांनी पुढे सांगितले की, नागरिकांना वेळेत सेवा मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. मात्र संबंधित विभागातील कर्मचारी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. हा प्रकार त्वरित थांबवण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांवर तातडीने दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आयुक्तांकडे अधिकृत तक्रारही दाखल करण्यात आली असून, संबंधित विभागाच्या कामकाजाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, कार्यालयातील उपस्थितीआणि नागरिकांशी वागणूक याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्याची आवश्यकता असल्याचेही नागरिकांनी नमूद केले आहे. या घटनेमुळे महापालिकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक ठरत आहे. नागरिकांना दर्जेदार आणि वेळेवर सेवा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.